**Arts & Commerce College Warwat Bakal**
**Tq. Sangrampur Dist. Buldana**

**Research Papers 2019-2020**

| Sr. No | Title of Paper | Name of Author | Department | Journal | Year | Impact Factor |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ब्रिटिशांचा भारतातील शेतीच्या व्यापारीकरणावरील आर्थिक प्रभाव | Subhash S. Pawar | History | Vidyawarta- Peer reviewed international referred research journal | 2020 | |
| 2 | महात्मा गांधीजींचे मूल्याधारित शिक्षण विचार - चिकित्सक विश्लेषण | Subhash S. Pawar | History | Research journey- International multidisciplinary research journal | 2020 | 6.625 |
| 3 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्वप्नातील भारताची जडण घडण | Subhash S. Pawar | History | Ajanta- An international multidisciplinary quarterly research journal | 2019 | 6.399 |

VIDYAWARTA®
Peer Reviewed International Refereed Research Journal
Special Issue- February- 2020
(Vol- I)

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते ।
KHAMGAON

Sahakar Maharshi Late Bhaskaarrao Shingne
Smruti Arogya and Shikshan Prasarak Mandal's

# SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGE ARTS COLLEGE,

KHAMGAON, DIST.BULDHANA (M.S.)

(Affilliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.)

Organizes

One Day Inter Disciplinary National Conference on

# HUMANITIES, CULTURE AND SOCIETY

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Special Issue-01, February 2020

Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne
Smruti Arogya And Shikshan Prasarak Mandal's

**Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College,**
Khamgaon, Dist.Buldhana

**Organizes**
One Day Interdisciplinary National Conference On

# Humanities, Culture and Society

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

26) अण्णाभाऊ साठे यांच्या पोवाडे व लावणीतील मानवतावादी दृष्टिकोन
डॉ. विष्णू नामदेव लांडे, वाशीम ||87

27) वास्को डी गामा : साहशी पोर्तुगीज खलाशी
प्रा. ज्ञानेश्वर दामोधर वारंगे, चांदूरबाजार ||89

28) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सांसदीय लोकशाहीसंबंधी विचार
डॉ. सुनिता मनवर, शेंदुरजना (अढाव) ||91

29) ब्रिटीशांचे भारतातील आर्थिक शोषणांचे धोरण व त्यांच्या अवस्था
प्रा. डॉ. वाय. एस. माहुरे, घाटंजी ||93

30) संस्कृती रक्षण काळाची गरज
प्रा. डॉ. गोकुल एस. डामरे, शेगांव ||95

31) भारतीय समाजावर परिकिय हल्यांचा प्रभाव
श्री. विनोद उखर्डा धर्माळ, बुलडाणा ||97

32) ब्रिटीशांचा भारतातील शेतीच्या व्यापारीकरणावरील आर्थिक प्रभाव
डॉ. सुभाष एस. पवार, बुलडाणा ||100

33) ब्रिटीश कालखंडातील भारतीय हस्तोद्योगांवरील आर्थिक प्रभाव
प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर, बुलडाणा ||103

34) इतिहालेखनात सबाल्टर्न इतिहासलेखन प्रवाहाचे महत्त्व
कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे, अमरावती ||105

35) ब्रिटीश वऱ्हाड प्रांतातील स्त्री विषयक सामाजिक सुधारणांचा प्रारंभ
प्रा. डॉ. भास्कर शा. वझिरे, अकोला. ||109

36) विदर्भातील आद्य ग्रंथालय - बाबुजी देशमुख ग्रंथालयाचे योगदान
प्रा.डॉ.संतोष गोपाळकृष्ण कुलकर्णी, अकोला ||111

37) १९ व्या शतकालीन महाराष्ट्रातील स्त्री परिवर्तनाच्या चळवळीचा इतिहास
प्रा. सुनिल मदन मनवर, अकोला ||113

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

**32**

# ब्रिटीशांचा भारतातील शेतीच्या व्यापारीकरणावरील आर्थिक प्रभाव

डॉ. सुभाष एस. पवार
सहयोगी प्राध्यापक, इतिहास, विभाग प्रमुख,
कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट (बकाल), जि. बुलडाणा

***********

**प्रस्तावना :-**

पंधराव्या शतकाच्या सुमारे दीड हजार वर्षाच्या काळात जगातील अनेक देशांवर सरंमशाहीचा पगडा बसला होता. त्या काळातील समाज आधिकारश्रेणीने व जाचक बंधनांनी जखडला गेला होता. वस्तूंचे उत्पादन आणि वितरण इत्यादी बाबी रूढी, परंपरेनुसार चालत असत. परंतू पंधराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंतचा काळज्ञ म्हणजे व्यापारीकरणाचा काळ होय. मध्यकालीन समाजरचनेपेक्षा वेगळयाप्रकारची समाजरचना या काळात अस्थित्वात आली. ॲरिस्टॉटल, सेंट थॉमस इत्यादी नितीशास्त्रियांचा प्रभाव व मध्यकालीन समाजसंस्थांचा प्रभाव व मध्यकालीन समाजसंस्थांचा प्रभाव कमी होऊन जागतीक समाज व्यापारी वर्गाच्या प्रभावाखाली आला. बहूसंख्या समाजात संपत्तीची प्राप्त व संचय प्रवृत्तीत वाढ झाली. त्यातूनच व्यापारवाद व वापारवादाचा परिणाम वसाहतवादात परिवर्तीत झाला.

**इंग्रजांचे भारतात आगमन :-**

इंग्रज डच, पोर्तुगिज या व्यापारवादातूनच भारताकड आकृष्ट झालेत, कालांतराने भारतातील अस्थिर राजकीय परिस्थितीचा फायदा घेवून इंग्रजांनी भारतात इ.स. १७५७ या प्लासीच्या लढाईत आपल्या सत्तेची मुहूर्तवेढ रोवली. भारतातील विजयाचा साम्राज्यवादी मनोवृत्तीच्या इंग्रजांनी भरपूर फायदा करुन घेतला. इंग्रजांनी भारतीय कृषी व्यवस्थेत व्यापक बदल केले. नवी भुसुधारण पध्दती, मालकीहक्काच्या नव्या कल्पना, वहिवाटीतील बदल, अधिकाधिक भुराजस्वाची मागणी ह्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत व सामाजीक संबंधात परिवर्तन घडून येवून कृषीक्षेत्र ढवळून निघाले. भारतीय अर्थव्यवस्थेचा असा कोणताही पैलू शिल्लक उरला नाही.[१]

**इंग्रजांची भूमीकर व्यवस्था व प्रशासन :-**

इंग्रजांनी भारताच्या विजयाचा आर्थिक लाभासाठी जास्तीत जास्त उपयोग करुन घेतला. ब्रिटीशांच्या व्यापारी व औद्योगिक हितसंबंधानी कंपनीला आयात निर्यातीवर कर वाढविण्यास प्रतिबंध लावला, त्यामूळे कंपनीचे उत्पन्नाचे मुख्य साधन शेतीवरील कर हे होते. म्हणूनच त्यावर जास्त लक्ष केंद्रित करण्यात आले. भारतातून जास्तित जास्त पैसा उपटण्याच्या तत्वाला इंग्रज चिकटून राहिले. प्रारंभी ईस्ट इंडिया कंपनीने भूमिकरांचा लिलाव करुन जास्तित जास्त बोली बोलणाऱ्यास जमिनी दिल्या. परिणामी शेतकऱ्यांना पिकांच्या उत्पादनासाठी जास्त खर्च लागत असल्याने शेती परवडेनासी झाली. बरीच जमिन पडीक पडून कृषी उत्पन्नात घट झाली. म्हणूनच पुढील काळात भूसुधारणाच्या नव्यापध्दती अस्थित्वात आणल्यात.[२]

ब्रिटीश शासकांनी भारतात भूराजस्वाच्या वेगवेगळ्या पध्दतीचा वापर केला. ज्या आधारावर जमीनदार किंवा शेतकरी यांना राज्याकडून जमीन मिळते त्या शेतकऱ्यांना भूस्वामीकडूनही जमिन मिळत असे. इंग्रजांनी भारतात जमीनदारी, महालवारी व रयतवारी ह्या तीन भूसारण पध्दती भारतात सुरु केल्यात. कायम जमिनदारी पध्दती ही बंगाल, बिहार, ओरिसा, बनारस विभाग व उत्तर कर्नाटक लागू केली, भारतातील ब्रिटीश प्रदेशपैंकी सुमारे १९ टक्के जमीन क्षेत्र कायम जमिनदारी पद्धतीने प्रभावित झाले, महालवारी पद्धती जी उत्तर भारत, मध्ये क्षेत्र व पंजाव प्रांतात लागू करण्यात आली. त्यांनी सुमारे ३० टक्के प्रदेश प्रभावित झाला, तर रयतवारी पद्धती मुंबई विभाग मद्रास इत्यादि ठिकाणी लागू करण्यात आली त्यामूळे त्यात ब्रिटीश भारताचा सुमारे ५१ टक्के प्रदेश प्रभावित झाला.[३]

राज्याच्या एकूण उत्पनांच्या अर्ध्यापेक्षा जास्त उत्पन्न भुमिकरापासून मिळत असे आणि त्यात वाढ करण्यास वाव असल्याने इंग्रज शासकांनी प्रथमत: भूमिकराकडे जास्त लक्ष दिले. भुस्वामित्वाच्या नव्या कल्पना, नवे कायदे, अतिरिक्त भूमीकरणाची मागणी ह्या व्यतिरिक्त इंग्रजांनी भुमिकर अवधी संबंधीही दूरगामी बदल केलेत त्यामुळे भूमिकरापासून मिळणारी आय हळूहळू कशी वाढत गेली या संबंधी आर. सी. दत्त यांनी खालील आकडेवारी दिली.

| वर्ष | रक्कम पैंड्स मध्ये |
|---|---|
| इ.स. १८१७-१८ | १२,३६३,६३४ |
| इ.स. १८२७-२८ | १३,७५४,७०३ |
| इ.स. १८३७-३८ | ११,८५३,९७५ |
| इ.स. १८४७-४८ | १४,४३७,२५४ |
| इ.स. १८५७-५८ | १५,३१७,९११ |

इ.स. १९५८-५९ मध्ये भूमिकरापासूंचे उत्पन्न सरकारच्या एकूण उत्पन्नाच्या ५० टक्के इतके होते. ४ ईस्ट इंडिया कंपनीच्या

भूमीकर पद्धतीचे प्रमुख वैशिष्टये म्हणजे आत्यंतीक कराची मागणी व वसुलीतील कठोर व्यवहार ही होती. त्यामुळे भारतरची अर्थव्यवस्था पोखरुन निघली. थोडक्यात ग्रामीण भारताची अविकसित अवस्था आणि मागासलेपण ब्रिटीश वसाहतवादाची देणगी होय.[५] त्यातच सरकारी अधिकारी किंवा जमिनदार व महाजन यांच्याकडून शेतकऱ्यांचा होणारा छळ आणि सावकारांकडून होणारी फसवणूक त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन जगणे असह्य झाले होते. असे असले तरी १८५७ नंतर पुन्हा भारतीय व्हाईसरॉय व त्यांचे प्रशासन यांनी जुन्या वसाहतवादी अर्थव्यावस्थेत बदल करुन उद्योग व कृषी क्षेत्रातील होत असलेले पतन रोखून त्यात नवीन परिवर्तन केले जे शेतीचे व्यापारीकरण म्हणून ओळखले जाते.[६]

**इ. स. १८५७ नंतरच्या काळातील भारतीय शेतीचे व्यापारीकरण:-**

१९ साव्या शतकाच्या उत्तरर्धात ब्रिटीश वससाहतवादी अर्थकारणात झालेला आणखी एक बदल म्हणजे कृषी क्षेत्रात अधिकाधीक झालेले व्यापारीकरण होय. भारतातील कृषाक शेतीला उपजीविकेचे साधन मानीत असत त्यामूळे त्यात व्यापारिकरणाची वृत्ती नव्हती. परंतु इ.स. १८५७ नंतर ब्रिटीशांनी नीति ब्रिटनची आवश्यकता पूर्ण करुन घेणरी होती. त्यासाठी भारतीय शेतीतील उत्पादीत मालाची आवशकाता ब्रिटनला होती, त्याचा उपयोग ब्रिटनने व्यापारिकरणासाठी करवुन घेतला.[७] इ.स. १८५२ नंतर भारतात रेल्वेचे जाळे पसरले, रेल्वेचा, वाहतुक आणि दळणवळणच्या आधुनिक साधनांचा विकास झाल्यामुळे ग्रामीण भागापासून तर शहरापर्यंत दळणवळणास वेग आला. खेड्यातील तयार होणारा माल दुसऱ्या भागातील खेडयापर्यंत जलद गतीने पाठविणे शक्य झाले. ही केवळ देशांतर्गतच प्रक्रिया नव्हती, तर आधुनिकीकरणाचा दुसरा परिणाम म्हणजे संपुर्ण जग जवळ आले. इ.स. १८६९ साली सुरु झालेल्या सुवेझ कालव्यामुळे इंग्लंड व भारतातील समुद्रमार्गे होणाऱ्या प्रवासाचे अंतर सुमारे तीन हजार मैलांनी कमी झाले.. वाफेच्या शक्तीवर चालणाऱ्या जहाजांमुळे प्रवासाला पुर्वी लागण-या वेळेपेक्षा कितीतरी वेळ कमी झाला. या आधुनिक बदलांनी भारतातील शेती मालाच्या उत्पादनावर प्रभाव टाकला.[८]

इ.स. १८६० ते १८६५ या काळात अमेरिकेत यादवि युद्ध झाले. त्यामुळे अमेरिकेला कापसाची निर्यात करणे अशक्या झाले. इंग्लडचे औद्योगिकीकरण झाल्याने औद्योगिकीकरणाची चाके सतत फिरती ठेवण्यासाठी इंग्लडला कापसाची आवश्यकता भासू लागली. इंग्लडच्या या गरजेमुळे इंग्लडमध्ये भारतातून मोठया प्रमाणात कापूस मागविल्या जावू लागला. वरिल कारणांमुळे भारतीय व्यापारिकरणास चालना मिळाली.

इंग्लडच्या व्यापारी व औद्योगिक हितसंबंधामुळे ब्रिटनने भातरतात नगदी पिकांच्या उत्पादनात महत्त्व दिले. भारतीया कृष्क वर्गाने वसाहतीकरणाच्या ब्रिटनच्या नितीमुळे विवश होऊन व्यापारिकरणाचे तत्व स्विकारले. तर ब्रिटीश सरकारनेही शेतकऱ्यांच्या उत्पादनाला चालना दिली. भारतात शेतीचे क्षेत्र जास्त असुन त्यात विविधता आहे हे ओळखून ग्रामीण भागातील शेती उत्पादकांना मुख्यप्रवाहात आणण्याची निती ब्रिटनने आत्मसात केली. ब्रिटनने जबरदस्तीने भारतीय शेतकऱ्यांना शेतीतून जी उत्पादने घ्यावयास लावली ती ब्रिटीशांची निती येथील जनतेच्या उपयोगाची नव्हती. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ डोळयासमोर ठेवून ब्रिटीशांनी तो निर्णय घेतला होता. कापूस, ताग, शेंगदाणा, तीळ, ऊस, तंबाखू ही पिके अन्य धान्याऐवजी अधिक फायदेशिर असल्याचे सिद्ध झाले. तसेच मसाल्याचे पदार्थ, फळे इत्यादिंचे उत्पादन वाढले. या व्यापारिकरणात चहा व रबराचे उत्पादन मात्र सर्वाधिक होते.[९] ह्या पिकांना मोठ्या बाजारपेठाही उपलब्ध होत्या. शेतीच्या या व्यापारिकरणाची व उत्पादनाच्या विशेषीकरणाची अनेक कारणे होती.

ही एक मुक्त अर्थव्यास्था होती, कि ज्यात रुढी व परंपरेला बाजुला सारुन करार व स्पर्धा निर्माण झाली होती, देशी व विदेशी व्यापारात वाढ करणे, रस्ते व रेल्वेच्या साहाय्याने राष्ट्रीय बाजारपेठांचा विकास करणे, इंग्रजांच्या भांडवलामुळे परकिय व्यापारात वृद्धी करणे इत्यादी बाबी त्यात अंतर्भूत होत्या. शेतीचे व्यापारिकरण भारतीय शेतकऱ्यांना न आवडणारी परंतू टाळता न येणारी आर्थिक गरज होती. कारण शेतीवरील महसुल कर इतका जास्त होता की तो देणे कित्येक वेळा शेतकऱ्यांना शक्य होत नव्हते परिणामी शेतकऱ्यांना सावकरांचे कर्ज घ्यावे लागत असे. पण त्या कर्जावरील व्याज इतके होते की, त्यामुळे शेतकरी मिळेल त्या किमतीत आपला माल विकत असे. कधी कधी तर तेच पिक शेतकऱ्यांना काही काळाने अधिक भावात विकत घ्यावे लागत असे. शिवाय आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील किंमतीच्या चढ - उतारामुळे भारतीय शेतीतील मालावर त्याचा परिणाम होत असे. भारतात प्रथमता बंगाल प्रांतात व्यावसायिक शेती करण्यास सुरुवात झाली. निळ व जुट उत्पादन बंगाल मधिल प्रमुख उत्पादन होते. नंतर त्यात चहाच्या उत्पादनाचाही समावेश करण्यात आला. निळ, जुट व चहाच्या उत्पादन करण्यावरील शेतकऱ्यांच्या अधिकाराला बाजुला सारुन इंग्रजांनी राजस्वपुर्तीसाठी या पिकांवर आपला एकाधिकार कायम केला.[१०] इ.स. १९६० ते १९४७ च्या दरम्यान या उत्पादनात वाढ होत राहीली. तसेच निळ व चहाच्या मळयांवर युरापीयनांचे वर्चस्व

निर्माण झाले. तसेच दक्षिण भारतात कापूस व उसाच्या पिकाला प्राधान्य देण्यात आले. ही सर्व नगदी पिके होती. शेतीच्या या व्यापारीकरणाचे परिणाम पुढे शेतकऱ्यांना भोगावे लागले.

**शेतीच्या व्यापारीकरणाचे परिणाम :-**

भारतीय शेतीच्या व्यापारिकरणाचा ब्रिटीश साम्राज्यवाद्यांना अधिक फायदा झाला. आसाम, बंगाल, बिहार, उत्तर भारत इत्यादि प्रदेशात मळेवाल्यांनी आपले भांडवल त्यात गुंतविले. विशेषत: चहा व निळीच्या नगदी पिकांच्या उत्पादनात प्रचंड नफा कमावून त्यांची निर्यात करून लागले. ब्रिटीशांच्या खालोखाल भारतीय जमिनदार, सावकार व दलाल यांनाही या व्यापारिकरणाचा फायदा झाला. जरी शेतकरी शेतावर राबत असला तरी पैशाच्या जोरावर उत्पादनाच्या साधनांवर धनिक वर्गाचाच ताबा होता. परिणामी व्यापारिकरणाचा फायदा मात्र गरीब शेतकऱ्यांना मिळालाच नाही.

**निष्कर्ष :-**

भारतीय शेतीतील उत्पादित मालाच्या व्यापारिकरणामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठांवर राहावे लागत असे. बाजारपेठांतील किंमतीच्या चढ-उतारावर शेतकऱ्यांचे भवितव्य ठरु लागले. मालाचे भाव वाढले तर त्याचा नफा दलालांना मिळत असे आणि किमती घसरल्या तर तोटा मात्र शेतकऱ्यांना सहन करावा लागत असे. शेतीच्या व्यापारीकरणाचा परिणाम शेतजमिनिवरही झाला. शेतजमीन आता विक्रीची वस्तु बनली. ज्यांचा शेतीशी प्रत्यक्ष संबंध नव्हता असे इतर लोकसुद्धा शेती खरेदी करु लागले. शेतकऱ्यांना मात्र शेती न परवडणारी झाल्याने ते शेती विकू लागले. परिणामी भूमिहिनांच्या संख्येत वाढ झाली. शेतीच्या व्यापारीकरणामुळे बिहार व उत्तर भारतातील शेतमजुरांचे स्थलांतरण झाले. चहाच्या मळयांत काम करुन नफा मिळविणारे दलालही भारतात निर्माण झालेत. शेतातील उत्पादीत नगदी पिकांना महत्व आल्योने सामान्य जनतेची दैनंदिनांची ज्वारी, बाजरीसारखी स्वस्त धान्याची निर्मितीच बंद पडली. त्यामुळे त्यांच्या किंमती वाढल्या आणि सामान्य जनतेच्या या अन्न तुटवडयामुळे त्यांना जीवण जगणे कठीण झाले. व्यापारीकरणाची दुसरी बाजू म्हणजे गावाची स्वयंपूर्णता नष्ट घेवून गावातील सामान्य जनता विश्वाच्या व्यवहाराशी प्रत्यक्ष जुळली. त्यामुळे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला त्याचाही हातभार लागला. ऐतिहासिक विकास प्रक्रीयेचा तो दुसरा टप्पा होता. त्याने पुढे राजकीय जनजागृतीत महत्वाची भूमिका निभावली.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. शुक्ल आर. एल. (संपा) "आधुनिक भारत का इतिहास" हिंदी माध्यम कार्यान्वय निर्देशालय, दिल्ली विश्वविद्यालय, व्दितीय संस्करण २००३, पृ १७८

२. भिडे गजानन "आधुनिक भारताचा इतिहास" अनिरुद्ध पब्लिकेशन हाऊस, पुणे, व्दितीय आवृत्ती २००४, पृ ३८-३९

३. ग्रोवर बी. एल. (बेल्हेकर एन. के. अनु.) "आधुनिक भारताचा इतिहास" एस. चन्द, आणि कंपनी लि. नई दिल्ली, तृतीय संस्करण २०१०, पृ १९६

४. ग्रोवर बी. एल. "उपरोक्त" पृ. २०५

५. ग्रोवर बी. एल. "उपरोक्त" पृ. २०५

६. शुक्ल आर. एल. (संपा) "पूर्वोक्त" पृ. १३५

७. शुक्ल आर. एल. (संपा) "पूर्वोक्त" पृ. १३५

८. तंबोळी एन. एस.; पवार व्ही. पी. "आधुनिक भारत इ. स. १७५० ते २००९" निराली प्रकाशन, पुणे २०१०, पृ. ५-७

९. ग्रोवर बी. एल. "पूर्वोक्त" पृ. २०२

१०. गोपाल एस. (देशपांडे सरोज, अनु.) "ब्रिटीशांची भारतातील राजतीती" डायमंड पब्लिकेशन, पुणे, व्दितीय आवृत्ती २००६, पृ. ३६

❑❑❑

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2020 Special Issue – 217 (B)

## IMPACT OF VALUES BASED ON M.K.GANDHI, PT. J. NEHRU, DR. B. R. AMBEDKAR & DR. PANJABRAO DESHMUKH'S PHILOSOPHIES IN PRESENT SITUATION



**Guest Editor:**
Dr. Rameshwar M. Bhise,
Principal,
Shri Shivaji College of Arts, Commerce and Science,
Akola [M.S.] INDIA

Hon. Sheshraoji S. Khade,
Secretary,
Shri Shivaji Education Society, Amarawati

**Chief Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar

**Executive Editor of the issue:**
Dr. Jivan H. Pawar
Dr. A. S. Raut
Dr. G. V. Korape
Dr. Sanjay J. Tidke
Dr. Ananda B. Kale,
Dr. S. D. Thorat

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2020 Special Issue –217 (B)

## IMPACT OF VALUES BASED ON M.K.GANDHI, PT. J. NEHRU, DR. B. R. AMBEDKAR & DR. PANJABRAO DESHMUKH'S PHILOSOPHIES IN PRESENT SITUATION

**Guest Editor:**
Dr. Rameshwar M. Bhise,
Principal,
Shri Shivaji College of Arts, Commerce and Science,
Akola [M.S.] INDIA

Hon. Sheshraoji S. Khade,
Secretary,
Shri Shivaji Education Society, Amarawati

**Chief Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar

**Executive Editor of the issue:**
Dr. Jivan H. Pawar
Dr. A. S. Raut
Dr. G. V. Korape
Dr. Sanjay J. Tidke
Dr. Ananda B. Kale,
Dr. S. D. Thorat

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | महात्मा गांधींचे अहिंसेसंबंधीचे विचार | प्रा.अरुण मुकुंदराव शेळके राज्यशास्त्र विभाग प्रमुख<br>शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय,अकोला | |
| 13 | महात्मा गांधींचा मानवतावादी विचार | डॉण्श्रीकृष्ण काकडे<br>मराठी विभाग<br>शंकरलाल खंडेलवाल<br>महाविद्यालयएअकोलाए444002" | |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सांस्कृतिक योगदान | प्रा. दिवाकर सदांशिव<br>सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडा,<br>जि. अकोला | |
| 15 | सद्य परिस्थितीवर एम के गांधी यांच्या तत्वज्ञानात्मक मुल्यांचा प्रभाव | कल्याणी वि.मंडलिक | Fee Paid Dt.17.01 .2020 |
| 16 | आधुनिक काळात गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा. डॉ. रमेश गुलाबराव सुरळकर | |
| 17 | VALUE EDUCATION THROUGH INDIAN CULTURE | Dr. Amit S. Tankar<br>(Librarian)<br>Shri. Dr.R.G.Ratod Arts and Science College ,Murtizapur.Dist.Akola.<br>Mobile No. : 09552375415. | |
| 18 | महात्मा गांधीजीचे मुल्यधारीत शिक्षण विचार –चिकित्सक विश्लेषण | प्रा. डॉ. सुभाष शकंरराव पवार<br>कला व वाणिज्य महाविद्यालय,<br>वरवट बकाल, जि. बुल–सजयाणा<br>मो. नं. 9423721646 | |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा षिक्षणविषयक ृदष्टीकोण | प्रा. डॉ. विलास एम डेहनकर<br>ग. भि. मुरारका महाविद्यालय,<br>–शेगांव, जि. बुलढाणा 444203 | |

# महात्मा गांधीजीचे मुल्यधारीत शिक्षण विचार — चिकित्सक विश्लेषण

प्रा. डॉ. सुभाष शंकरराव पवार

कला व वाणिज्य महाविद्यालय,

वरवट बकाल, जि. बुलढाणा

मो. नं. ९४२३७२१६४६

सारांश :—

शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. यामध्ये मनुष्याचा प्रामुख्याने बौध्दिक, मानसिक व क्रियाशिल विकास अपेक्षित असतो. मात्र आजच्या शिक्षणातून ज्ञानात्मक व क्रियात्मक पातळीचा विकास जरी होत असला तरी भावनात्मक पातळीला स्थान मिळाले नाही. त्यामुळे विद्यार्थांमध्ये राष्ट्रीय वृत्ती, सामाजिक जाणीव यांचा अभाव दिसून येतो. महात्मा गांधींनी जेवढे स्वातंत्र्य लढयाला महत्व दिले. त्यापेक्षाही जास्त स्वतंत्र भारतासाठी अपेक्षीत असलेली शिक्षणपध्दती देण्याचा प्रयत्न केला. स्वयंपूर्ण व चरित्रवान नागरिक तयार व्हावेत हे या शिक्षण पध्दतीचे खास वैशिष्टय होते. त्याचच परामर्श संबंधीत लेखात घेतला आहे.

प्रस्तावना :—

आजच्या भारतीय सामाजिक व राजकीय परिस्थीतीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, उच्च परंपरा असलेल्या भारतीय संस्कृतीचा ऱ्हास होत चालला आहे. याचा साकल्याने विचार केल्यास विद्यार्थांमध्ये वाढत असलेली बेशिस्त, विध्वंसक वृत्ती, नैतिकतेचा अभाव ही कारणे दिसून येतात. भारतीय संस्कृतीचा पायाच मुळात मुल्यावर आधारित आहे. तसेच भारतीय समाज रचनेचा व सांस्कृतीक विविधतेचा विचार केल्यास धर्माच्या माध्यमातून भारतासारख्या देशात शिक्षण देणे योग्य होत नाही म्हणूनच महात्मा गांधी म्हणतात की "सर्व धर्मासाठी सामान्य असलेले सत्य सर्व धार्मियांना शिकविले जावू शकते" [१] मानवी मुल्य हे असे विधायक वर्तन असते की ज्यातून व्यक्ती विकास, समाज विकास, राष्ट्र विकास व आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्मान होते.

आधूनिक शिक्षणाचा प्रारंभ :—

भारतात इस्ट इंडिया कंपनिच्या काळात शिक्षणास प्रारंभ झाला. परंतू भारतात शैक्षणिक विकासाबाबत कंपनीचे किंवा ब्रिटीश पार्लमेंटचे धोरण हे उदासिनतेचेच होते. विशेषत: राष्ट्रीय कॉंग्रेसच्या प्रारंभानंतर शैक्षणिक विकासाकडे ब्रिटीश शासनाने लक्ष देण्यास प्रारंभ केला. इ. स. १९१३ साली सर्व प्रांतातून विद्यापीठ स्थापन करण्याचा व शैक्षणिक पात्रता वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचा विरोध शिक्षणाबाबतचे धोरण जाहीर करतांना ब्रिटीश शासनाने केला. [२] त्यानुसार इ. स. १९१९ नंतरच्या काळात सुमारे १७ विद्यापीठ भारताच्या निरनिराळया प्रांतात स्थापन करण्यात आलीत. भारतात विद्यापीठांची संख्या वाढू लागली त्यातून शासनाला त्यांच्या कामकाजात सुसंगती आणण्याचीही गरज भासली. त्यादृष्टीने इ. स.

१९२१ साली केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली. वेळोवेळी शैक्षणिक समस्यांवर विचार विमर्श करुन त्याबाबत सरकारला सल्ला देणे व सूचना करणे हे या समितीचे कार्य होते. इ. स. १९३५ ला या मंडळाने व्यवसायिक दृष्ट्या शिक्षण उपयुक्त बनविण्याच्या दृष्टीने अनेक महत्वपूर्ण शिफारशी केल्यात. [३] बेकारांचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने त्यांना तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण दिले जावे अशी या समितीने एक महत्वाची सूचना केली.

दुसऱ्या जागतिक महायुध्दा दरम्यान भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा घसरला. त्यावर उपाय म्हणून ब्रिटीश सरकारने शिक्षण सल्लागार सर जॉन सार्जंट याला त्यावर उपाययोजना करण्याचे काम सोपविले त्याने इ. स. १९४४ ला अनेक मौलिक सुचना केल्यात. त्यापैकी शिक्षकांच्या सेवा स्थितीत सुधारणा व्हावी, उच्च शिक्षणातील संशोधनाचा दर्जा सुधारावा आणि विद्यापीठांना शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाचा विनियोग योग्य रितीने व्हावा यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात यावी हया महत्वाच्या सुचना होत्या. [४]

महात्मा गांधीची वर्धा शिक्षण योजना :—

भारतात सद्यास्थितीत प्रचलित असलेली शिक्षण प्रणाली ही देशाच्या एकुण परिस्थीतीच्या संदर्भात निर्धारीत करण्यात आली नाही, तर ती ब्रिटीश शासनाच्या सोईनुसार येथे लागू करण्यात आली आहे. परीणामी प्रत्यक्ष व्यवहारीक जीवनात आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी ती कुचकामी आहे. या पार्श्वभूमीवर इ. स. १९३७ ला महात्मा गांधींनी 'हरिजन' या वृत्तपत्रातून जी शिक्षण योजना प्रस्तूत केली ती 'मूलभूत शिक्षण योजना' किंवा 'वर्धा शिक्षण योजना' म्हणून प्रसिध्द झाली. [५]

गांधीजींनी पुरस्कृत केलेली ही योजना अशी होती की शाळांमधील शिकविल्या जाणऱ्या अभ्यासक्रमाचा कालावधी सात वर्षाचा असावा, शिक्षणाचे माध्यम मातृभाषेत असावे, मुलींकरीता वेगळया शाळा न ठेवता सहशिक्षणाला चालना देण्यात यावी, विद्यार्थाच्या बौध्दिक विकासाबरोबरच मानसिक व नैतिक शिक्षणाच्या विकासावर भर देण्यात यावा. म्हणजेच शिक्षण घेत असतांना आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थांना आपल्या पायावर उभे राहाता यावे म्हणून त्याला उपयुक्त ठरेल असे व्यवसायिक शिक्षण शाळांमधूनच देण्यात यावे. शिक्षण घेत असतांना विद्यार्थांनी तयार केलेल्या वस्तू सरकारने खरेदी कराव्यात व शिक्षण संपल्यानंतर ज्या व्यवसायाचे शिक्षण विद्यार्थांनी घेतले असेल त्याला त्याच व्यवसायात सामावून घेण्याची हमी शासनाने घेतली पाहिजे. [६] असे या योजनेचे स्वरुप होते. शिक्षणाचा प्रसार खेडोपाळी व्हावा, तसेच मुले आर्थिक दृष्टया आपल्या पायावर उभे राहावित कि ज्यामुळे गावांची होत असलेली अवनती रोखता येईल, शिवाय निर्धन व सधन यांच्यातील अप्राकृतिक विभाजन कमी होईल.

गांधीजींनी पुरस्कृत केलेल्या या योजनेचा ऑक्टोबर १९३७ ला वर्ध्याला आयोजीत अखिल भारतीय शिक्षण परिषदेत चर्चा करण्यात आली. या योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी डॉ. झाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखली एक समिती स्थापन करण्यात आली. [७] या समितीने शिक्षण काळात विद्यार्थांनी तयार केलेल्या वस्तू मुलभूत शिक्षण योजनेच्या अंमलबजावनीकरीता शासनाने वापराव्या इत्यादी सुचना केल्यात. केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने वर्धा योजना व तीचा अभ्यासक्रम मंजूर केला. इ. स. १९३७ साली प्रांतात सत्तावाढ झालेल्या कॉग्रेस सरकारांनी प्रांतातून या योजनेची अंमलबजावनी सुरु केली. परंतू १९३९ ला प्रांतीय सरकार पायउतार होताच ही योजना मागे पडली.

निष्कर्ष :–

गांधीजी हे विसाव्या शतकात होऊन गेलेले एक महान व लोकविलक्षण व्यक्तिमत्त्व होते. ते सनातनी वृत्तीचे असूनही त्यांचे विचार अधिक आधुनिक होते. ते अत्यंत जुनाट, पुराणप्रिय, प्राचिन संस्कृतीचे अभिमानी असूनही त्यांनी नव्या काळाच्या समस्या, नवे विचार व नवे आदर्श यांच्याकडे दुर्लक्ष केले नाही. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी जीवन शिक्षणाचा क्रांतिकारक सिध्दांत मांडला. पुस्तकी पांडित्याला शिक्षण म्हणता येणार नाही. शिक्षणाने आपल्या काळातील जिव्हाळ्याच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे शोधून काढली पाहिजेत. शिक्षणात शारिरिक श्रमांचे महत्त्व वाढवून श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. असे शिक्षण गांधीजींना अपेक्षित होते.

तर्कशास्त्रापेक्षा व्यवहार आणि दैनंदिन जीवन हा त्यांच्या विवेचनाचा पाया होता. आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांवर प्रभावी मुल्याधिष्ठीत संस्कार होण्यासाठी गांधीजींच्या शैक्षणिक विचारांचे प्रस्तुतीकरण अभ्यासक्रमातून प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. प्रेरणेतूनच कालांतराने विद्यार्थ्यांच्या अपेक्षित वृत्तीत परिवर्तन घडून येईल यात शंका नाही.

संदर्भ :–

१. गायंद्धे एकनाथ "मूल्याधिष्ठीत शिक्षण – प्रक्रिया आणि उपचार" निर्मल प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती २०००, पृ. ३०–३१.

२. वैद्य सुमन; कोठेकर शांता "आधुनिक भारताचा इतिहास १९२१–१९४७" श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २००१, पृ ३१६.

३. वैद्य सुमन; कोठेकर शांता "उपरोक्त" पृ. ३१७.

४. शुक्ल आर. एल. (संपा.) "आधुनिक भारताचा इतिहास" हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, १९९८, पृ. ३३१–३३२.

५. ग्रोवर बी. एल; बेल्हेकर एन. के (अनु.) "आधुनिक भारताचा इतिहास" एस चंद आणि कंपनी, तृतीय संस्करण २०१०, पृ. ३१२.

६. वैद्य सुमन; कोठेकर शांता "उपरोक्त" पृ. ३२०.


७. ग्रोवर बी. एल; बेल्हेकर एन. के "उपरोक्त" पृ. ३१२.

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCItPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume-IX, Issue-I
January - March - 2020
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - I

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | ग्रामगीतेतील उद्योगशिलता<br>**प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर** | ४८-५३ |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्वप्नातील भारताची जडणघडण<br>**प्रा. डॉ. सुभाष एस. पवार** | ५४-५९ |
| १६ | ग्रामगिता आणि महिलोन्नती<br>**प्रा. डॉ. सौ. सोनाली राजेश वन्सोड** | ६०-६३ |
| १७ | राष्ट्रसंतांचे महिला सक्षमीकरणविषयक विचार<br>**डॉ. सुनिता मनवर** | ६४-६७ |
| १८ | राष्ट्रसंताचे ग्रंथाध्ययन विषयक विचार<br>**प्रा. डॉ. विलास खुणे** | ६८-७१ |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन माणिक बंडूजी ब्रम्हभट्ट ते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - एक जीवनप्रवास<br>**प्रा. डॉ. कु. वैशाली भिवसेन भिसे** | ७२-७६ |
| २० | राष्ट्रसंतांचा संगीत विषयक दृष्टिकोन<br>**प्रा. वर्षा सुनील आगरकर** | ७७-७९ |
| २१ | ग्रामगीतेतील जीवनमुल्ये विषयक विचार<br>**प्रा. अनिल शिवाजी आराक** | ८०-८५ |
| २२ | राष्ट्रसंतांच्या समाज प्रबोधनामध्ये संगीताची भूमिका<br>**प्रशांत राजवर्धन** | ८६-८९ |
| २३ | ग्रामगितेतील उद्योगशीलता<br>**सौ. प्रांजली योगेश बारस्कर** | ९०-९६ |
| २४ | समाजाचा महामेरु : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज<br>**डॉ. अमोल र. बोरकर** | ९७-१०० |
| २५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील जीवन मूल्ये !<br>**डॉ. सिद्धार्थ बुटले** | १०१-१० |
| २६ | राष्ट्रसंताची भजने, अभंग आणि समाज प्रबोधन<br>**सीमा देशपांडे** | १०५-१० |

# १५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्वप्नातील भारताची जडणघडण

प्रा. डॉ. सुभाष एस. पवार
सहयोगी प्राध्यापक, कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा.

**प्रस्तावणा**

महाराष्ट्राला प्रबोधनाची फार मोठी परंपरा लाभली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे त्यापैकीच एक होय. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांनी व कार्यांनी आजही समाजमन भारावून जाते. तुकडोजी महाराजांच्या पदवितच या संताचे कार्य सामावले आहे. समाजप्रबोधन हे राष्ट्रसंत तुकडोजी माहराज यांचे जीवितकार्य होते. राष्ट्रसंतांनी भजने, साहीत्य व प्रबोधनाच्या माध्यमातुन समतेचा, स्वच्छतेचा, विश्वात्मकतेचा, राष्ट्रीयत्वाचा संदेश मनामनापर्यंत पोचविला.

**विषय मांडणी**

**ग्रामगीता**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विसाव्या शतकात (इ.स. 1909 ते 1968) विदर्भात होवून गेलेले संत. त्यांच्या आयुष्यातील प्रारंभीची 38 वर्षे इंग्रजी राजवटीत म्हणजे पारतंत्र्यात गेली. उर्वरीत 21 वर्ष स्वतंत्र्यात तेही समाजवादी लोकशाही व्यवस्थेच्या प्रारंभिक जडणघडणीत व्यतीत झाली. ग्रामगीता ही महाराजांच्या साऱ्या लेखनाचे सत्व ग्रंथनिविष्ट करणारी साहीत्यकृती होय. राष्ट्रसंतांनी ही साहीत्य निर्मीती इ.स. 1954 मध्ये एका वर्षात धावपळीच्या कार्यव्यस्त जीवनक्रमात केलेली आहे. इ.स. 1955 मध्ये ग्रामगीता प्रकाशीत झाली. महाराजांना ग्रामीण भागात राहणारा कष्टकरी शेतकरी हा भोळा शंकर वाटतो. अशा ह्या भोळ्या शंकराच्या उत्थानासाठी सर्वांनी झटले पाहीजे असे महाराज सांगतात. कष्टकरी शेतकऱ्यांच्या विषयी वाटणाऱ्या कळकळीपोटीच महाराजांनी हा ग्रंथ त्यांना समर्पीत केला. ग्रामगीता ग्रंथात महाराजांच्या स्वप्नातील भारताचे सार आहे.

**ग्रामरक्षक दल**

गावाच्या संरक्षणासाठी राष्ट्रसंतांनी ग्रामरक्षक दल ही तरुणांची संघटना सूचविली आहे. गावाच्या जानमाल रक्षणाप्रमाणेच छंदी-फंदी व्यसनी व अनितीमान घटकांना जरब देण्यासाठी हे दल पंचाच्या नेत्वृत्वाखाली काम करील. यावरुन जनतंत्रातील स्वयंपूर्णतेबद्दल महाराज किती जागृत होते हे ध्यानात येते. महाराज लिहीतात

गाव गाव पडेगा डाका गुंडोसे रहेगा धोखा ।

यासाठी गावातील तरुण विद्यार्थी जागृत असला पाहीजे,

गावावर आली गुंडाची धाड । विद्यार्थी दारे लाविती धडाधड ।

बाप वडीलांच्या अब्रुची धिंड । काय शिक्षण कामाचे ॥1 ॥

म्हणोनि पाहीजेत बलवान मुले । कुस्ती, मल्लखांब खेळणारे भले ।

धडाडीने प्रतिकारार्थ धजले । तरीच शिक्षण उपयोगी ॥

महाराजांनी अशाप्रकारे शिक्षणात खेळाचे महत्व पटवुन सांगितले एकंदरच देशाची आजची परिस्थिती पाहता देशाला आज याची नितांत गरज आहे.

क्रांतीची हाक

अरे । उठा उठा, श्रीमंतांनो । । अधिकाऱ्यांनो । पंडितांनो । ।

सुशिक्षीतांनो । साधु-जनांनो । । हाक आली क्रांतीची ॥

गावागावासी जागवा । भेदभाव हा समुळ मिटवा ।

उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ॥

या ओव्यांवरून महाराजांची आर्त हाक लक्षात येते. महाराज म्हणतात मित्रहो, हे सुराज्य निर्माण करण्याचे कार्य तुमच्यापुढे पडलेले आहे. हे कार्य कोणत्याही एकट्या दुकट्याचे नाही त्या करीता आपण सर्वांनी छाती काढुन पुढे यावे हाच माझा संदेश आहे. राष्ट्रपती भवनामध्ये महाराजांचा कार्यक्रम झाला. महाराजांनी सर्व महान नेत्यासमोर भजने गायली  व त्यांना वरील प्रमाणे संदेश दिला, उपस्थित सारे महाराजांच्या कार्यक्रमाने भाराऊन गेले.

तुने रे भाई सच्चा धरम नही जाना । सरकारी नौकर होकर भी, सेवा करना नही सिखा ।

अर्जदारोसे खाता है पैसा, देश की इज्जत खोता रे ।

महाराजांनी अशी एकामागुन एक राष्ट्रप्रबोधनपर भजने तेथे गायीली, कार्यक्रम संपल्यावर राष्ट्रपती राजेंद्रबाबु प्रसाद यांनी महाराजांचे आभार मानले. आभार प्रदर्शनात बाबुजी म्हणाले यह राष्ट्रपती भवन की दिवारे कई दिनोसे मैली थी, आज हमारे महाराजजीके भजन व्दारा वह धो डाली गयी है । एकंदरच यावरून महाराजांच्या कार्याचा आवाका लक्षात येतो. साधुंनी सुध्दा आता राष्ट्रनिर्माण कार्याला लागले पाहीजे. भगवे कपडे घालणे किंवा चमत्कार दाखविणे हे त्यांचे कार्य नाही. साधू चमत्कारावर ओळखला जावु नये. आज त्यांच्या मार्फत देशात आणि संस्कृतीत मोठे परिवर्तन निर्माण झाले पाहीजे. यावर व या सारख्या गोष्टींवर महाराज भरत देत असत.

ग्रामदान

खरे त्याग निष्काम ही ग्रामसेवा । करू सर्वभावे करू स्वर्ग गाव ।

झिजो हे झिजो, देह कार्यी पडू दे । पडू दे प्रभो । पतन हे पडू दे ॥

ग्रामदान म्हणजे गावाच्या भलाईचा संकल्प. ज्याला जे येत ते दुसऱ्याला शिकवावे, ज्याचे घर रस्त्यात आडवे येत असेल त्याने ते काढावे, गावातील लोकांनी शेतीला उन्नत करावे असा हा सह-जीवनाचा प्रयोग आहे. विद्वान, योगी, तपस्वी, राजकारणी या सर्वांनी इतरांबरोबर कामाला लागले पाहीजे. हा प्रयोग सफल झाला तर गावाचे आणि देशाचे रूपच बदलून जाईल. हा संकल्प मनाशी करून निष्काम ग्रामसेवा करावी. या सेवेमुळे गाव स्वर्गवत होऊ शकतो त्यासाठी महाराजांनी याच कार्यात देह पडू दे अशी प्रार्थना प्रभूकडे केली आहे. आज या प्रार्थनेची नितांत गरज आहे.

स्वतंत्र रक्षण

अणुबॉम्ब भारताकडे असावा का? या प्रश्नाचे पत्रकाराला उत्तर महाराजांनी होय असे दिले होते. महाराज म्हणतात मला तर युध्द व तलवार गुळीच कोणी वापरू नये असे वाटत असते. कोणाही जीवांचा नाश होऊ नये हे आमचे ध्येय व लक्ष आहे. पण हे सर्व काय टिकविण्याकरीता आहे तर देश व धर्म यांची प्रतिष्ठा राखली जावी म्हणुन. परंतू एखादे राष्ट्र जर दुष्ट बुध्दीने आमची प्रतिष्ठा नामशेष करण्यासाठी आपल्याशी युध्द छेडत असेल व त्यामुळे आमच्या जीवनाला, संस्कृतीला व प्रतिष्ठेला धोका निर्मा होत असेल तर त्याचा प्रतिकार करण्यासाठी आम्ही आमची सर्व शक्ती खर्चून शस्त्रसंपन्न होवू व आमचा देश मानाने जगवु. भारतातील, जगातील सर्व शक्तींचा शस्त्रांचा आम्ही उपयोग करु पण अशी भौतिक शक्ती मिळविल्यावर आम्ही आततायीपणाने जगाचा संहार करण्याची कुबुध्दी आमच्याजवळ येऊ देणार नाही. पण कोणी अनुबॉम्बची दशहत देवून आम्हाला अन्यायाने नमवू नये. पुढे महाराज म्हणतात माणूस गिधाडासारखा, डुकरा-कुत्र्यासारखा जगण्याला निर्माण झालेला नाही. कुणीही यावे, त्याला दंडा मारावा व त्याने शरण जावे । गरज पडल्यास आम्ही सारे शहीद होऊ पण स्वाभिमान आणि राष्ट्राची प्रतिष्ठा गमावणार नाही. धर्म सोडणार नाही. आम्ही रणांगणावर प्राण देणे पत्करु, त्यात धन्यता मानू, पण डोळयादेखत राष्ट्राचा, संस्कृतीचा अवमान होऊ देणार नाही.

सारा भारत रहे शिपाई शत्रु को दहशाने किंवा

तैयार हुवा है हिंद तुम्हारे साथ ।

आओ चिनियो मैदान में, देखो हिंद का हात ।

अशा प्रकारचे भजने म्हणुन भारत चीन युध्द किंवा भारत पाकीस्तान युध्दाचे वेळी महाराजांनी भारतीय जनतेला, सैनिकांना प्रोत्साहीत केले होते. भारतीय सैन्यांनी अतिशय चिवट लढा त्यावेळी दिला होता. दहा दहा चीनी सैनिकांना एक एक भारतीय सैनिक भारी पडत होता. भारत हे विजयी राष्ट्र आहे ते कायमचे विजयी कसे राहील यासाठी दक्ष राहणे हे तुमचे माझे सर्वांचे कर्तव्य आहे. महाराज नेहमी असाच उपदेश भजन भाषणातुन करीत असत.

**शेती-उद्योग**

शेतीला प्रोत्साहन देणे, जनावर सुधृढ राहीले पाहीजे यासाठी जनावरांचे प्रदर्शन घेणे हे कार्यक्रम महाराज गावोगावी घेत असत.

गावी असावे वस्तु प्रदर्शन । आपुल्याच गांवी झाले निर्माण ।

बी-बीयाणे, शेती-उद्योग- सामान । तयामाजी ठेवावे ।

भारत-चीन युध्दाचे वेळी इ.स. 1962 मध्ये देशात मोठी अन्नधान्याची अडचण निर्माण झाली होती. कृषी प्रधान देशाची ही अवस्था पाहुन महाराजांचे हृदय द्रवले होते. महाराजांनी कृषी उत्पादन वाढविण्यासाठी सुरुवातीपासूनच जोर दिला. महाराज म्हणतात अन्नधान्याचे उत्पादन ही आमुची प्रमुख गरज आहे. तिच्या पुर्तीसाठी आपण रात्रंदिवस जागरुक असले पाहीजे. याशिवाय आपल्या उत्पादन कार्यात कलात्मकताही असली पाहीजे. कुंभार रात्रंदिवस खपून मातीची मडकी बनवतो. परंतु ती सारी ओबड-धोबड असल्यामुळे माणुस त्यांचा वापर करु इच्छीत नाही. चिनी भांडी मातीचीच असतात. वस्तुच्या निर्मीतीत कलेचा वापर अपरीहार्य असतो. कलात्मकतेशिवाय,सुंदरतेशिवाय उपयोगी वस्तूही टाकाऊ ठरते. आम्ही अशा प्रकारचे कलाज्ञान आणि सौंदर्यदृष्टी आत्मसात करणार नाही तर आम्ही निर्माण करु त्या वस्तू टाकाऊ ठरतील. आजच्या स्पर्धेच्या युगात महाराजांचे विचार तंतोतंत पटनारे आहे. जागतीक स्पर्धेत आपला माल टिकावा असे वाटत असेल तर महाराजांनी सांगितलेल्या प्रत्येक गोष्टी प्रत्यक्षात कृतीत आणाव्या लागतील. हे सर्व आवश्यक आहे. राष्ट्रजागृतीचा दृष्टीकोन एकदा आला की कलेने मनोरंजन आणि राष्ट्राचा विकास या दोन्ही गोष्टी घडतील आणि आपला भारतदेश शानदार होईल.

**विश्वधर्म**

इ.स. 1955 चे जुलै मध्ये महाराजांना विश्वधर्म व विश्वशांती परिषदेचे जपान येथून निमंत्रण आले. जपान येथे झालेल्या या परिषदेला महाराज उपस्थित होते. या परिषदेचे उद्घाटन महाराजांनाच करावे लागले. त्यामुळे राष्ट्रसंताच्यारुपाने अग्रमान भारतालाच मिळाला. तिथेच महाराजांनी खालील भजन लिहीले व त्याच भजनाने

परिषदेचे उद्घाटन झाले. महाराजांचे ते उद्घाटनीय भाषण म्हणजे विश्वाचा धर्म व विश्वशांती याचा गाभा होता. तिथे लिहीलेले भजन -

हर देशमें तू, हर भेषमे तू, तेरे नाम अनेक तू एकही है ।

तरी रंगभूमि यह विश्व भरा, सब खेलमे मेलमें तुही तो है ॥

परिषदेला आलेले अठ्ठावीस देशाचे विव्दान प्रतिनिधी बेहद खुश झाले. ती सगळी परिषदच राष्ट्रसंतमय झाली होती. महाराज स्वतः मेरी जापान यात्रा या पुस्तकात लिहीतात, की वहाँ मेरी परिस्थिती विवेकानंदजी के सरिखी हो गयी थी । या परिषदेला जमलेल्या विव्दानांनी महाराजांना जेष्ठ सल्लागार म्हणून नेमले व त्यांचेपुढे नतमस्तक झाले. महाराजांची तेथे 21 भाषणे झाली. महाराजांच्या खंजिरीच्या निनादाने हजारो लोकांना मोहीत केले. महाराजांच्या भाषणांचा अन भजनांचा मुख्य विषय होता मानवता, विश्वात्मकयोग अन विश्वबंधुत्व.

विश्व-स्नेह का ध्यान धरे ।

सबका सब सन्मान करे ।

महाराजांचे हे घोषवाक्य येत्या युगाच्या वैश्वीक युगधर्माची नांदी आहे. येवढी विशाल दृष्टी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची होती. अशी विशाल दृष्टी असणाने संत विरळेच. राष्ट्रसंत हे त्यापैकीच एक होय.

## निष्कर्ष

सर्व धर्म पंथ तथा देशाच्या लोकांना या नव्या युगाच्या विश्वशांती संस्थापनेच्या या मार्गात सहाय्य करण्याचे आर्जव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज करतात. त्यांच्या हाकेला ओ देण्याची आज गरज आहे. महाराजांच्या साहित्यामधुन, प्रत्यक्ष कार्यातुन, समाज प्रबोधनातुन राष्ट्रप्रेम, देशाभिमान पदोपदी दृष्टीस पडतो. महाराजांनी सांगितलेला राष्ट्रधर्म असो की सर्वधर्मसमभाव, उद्योग असो की शिक्षण असो. असा कोणताही विचार आपण सोडु शकत नाही आणि विशेष हे की, त्यांनी ग्रामपातळीवरून केलेला विचार हा भारतासारख्या कृषीप्रधान देशाला त्याची नितांत गरज आहे. भारताचे पहीले महामहीम राष्ट्रपती राजेंद्रबाबु प्रसाद यांनी त्यांना त्यावेळी राष्ट्रसंत उपाधिने गौरविले ते किती योग्य होते त्याची प्रचिती येते.

## संदर्भ ग्रंथ

1. वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज :- ग्रामगीता, श्रीगुरुदेव ग्रामगीता प्रतिष्ठान, गुरुदेव नगर, गुरुकुंज आश्रम, ता. तिवसा, जि. अमरावती (महाराष्ट्र) 444902-प्रकाशन तिथी प्रथम आवृत्ती 1955.

2. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज :- मेरी जापान यात्रा, श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम, प्रकाशक मो.रा. पुनसे प्रकाशन दि. 01 जानेवारी 2002.

3. गुलाब खवसे संकलन :- भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रसंत तुकडोजी ग्रामगीताचार्य गुरुकुंज आश्रम तुकडोजी महाराजांचे योगदान, प्रकाशक ग्रामगीता जीवन विकास परिषद विभाग, गुरुकुंज आश्रम, जि. अमरावती प्रकाशन तिथी 30 ऑक्टोबर 2015

4. श्याम लोहबरे :- राष्ट्रसंत तुकडोजी आणि श्रीमती फ्रान्स निकोली प्रकाशक श्याम लोहबरे निवास, 11, प्रगती कॉलनी, नागपूर 440015 व्दितीय आवृत्ती प्रकाशन 2002.

5. प्रा.विलास एम. ढेहणकर :- स्मृतींची चाळता पाने... प्रकाशक- सचिन उपाध्याय, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सिताबर्डी, नागपूर 440012, प्रथम आवृत्ती 24 ऑक्टोबर 2012.

6. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज :- गावागावासी जागवा, राष्ट्रसंत साहीत्य प्रकाशन, नागपूर 8, संकलन जयकुमर वाघ, श्रीगुरुदेव सेवाश्रम आष्टी, जि. वर्धा, प्रकाशन तिथी 30 एप्रिल 2001.

7. बाबा मोहोड (संपादक) :- राष्ट्रसंतांची भाषणे, प्रकाशक मो.रा. पुनसे प्रमुख श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज जि. अमरावती (महाराष्ट्र) प्रकाशन तिथी 1 मार्च 2014

8. राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज :- सद्‌विचार प्रवाह, प्रकाशक मो.रा. पुनसे प्रमुख श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज जि. अमरावती (महाराष्ट्र) प्रकाशन तिथी 1 मार्च 2014

9. प्रा. रघुनाथ कडवे :- ग्रामगीतेचा संत महात्मा दरबार, प्रकाशक : अमोल कडवे, अमोल प्रकाशन, 206 बी उज्वल, राहाटे कॉलनी, वर्धा रोड, नागपूर (महाराष्ट्र) प्रथम आवृत्ती 2003.

10. सुरेंद्र बुराडे (संपादक) :- संत बुवाबाजी आणि चमत्कार, प्रकाशक :: रुपराव वाघ, राष्ट्रसंत साहीत्य प्रकाशन, गुरुकृपा, 129, दुर्गादत्त अपार्टमेंट, क्वेटा कॉलनी, नागपूर प्रकाशन दि. 27 ऑक्टोबर 2010.